# बाबा मुक्तानंदांच्या शिकवणी

हा महिना, बाबा मुक्तानंदांच्या महासमाधीच्या वर्धापन दिनाचा महिना आहे आणि या महिन्यात, सिद्धयोगी आणि नवीन साधक महान 'सिद्धगुरू' बाबा मुक्तानंदांच्या असाधारण जीवनाचा आणि त्यांच्या परंपरेचा सन्मान करतात आणि त्याचा उत्सव साजरा करतात.

भगवंताला जाणण्याच्या स्वतःला असलेल्या उत्कंठेमुळे, बाबांना अगदी लहान वयापासूनच आध्यात्मिक अभ्यासांप्रति आकर्षण होते.

बाबा सदैव सत्संगाचा, सत्याच्या संगतीचा शोध घेत. त्यांनी स्वतःला साधनेप्रति समर्पित केले. साधना अर्थात तो आध्यात्मिक अभ्यास जो साधकाला दिव्यतेसह ऐक्य साधण्याच्या भावाकडे घेऊन जातो, ती दिव्यता जी प्रत्येक व्यक्तीच्या आणि प्रत्येक वस्तूच्या मूळाशी विद्यमान आहे. आपल्या खऱ्या स्वप्रयत्नांद्वारे आणि आपले गुरू भगवान नित्यानंद यांच्या कृपाप्रसादामुळे, बाबांना सिद्धगुरू हे पद प्राप्त झाले, असे पद की ज्यामध्ये त्यांना शक्तिपात दीक्षेच्या उपहाराद्वारे इतर साधकांना जागृत करण्याचे सामर्थ्य आणि अधिकार प्राप्त झाले.

बाबा नेहमी या विषयी सांगत, की भगवंताप्रति प्रेम आणि आपल्याच आत्मरूपात भगवंताला जाणण्याची उत्कंठा असल्यामुळे, कशा रीतीने साधकाची साधना पोषित होते, शक्तिपूरित होते. या उताऱ्यांचे वाचन आणि त्यांचा अभ्यास केल्यामुळे, तुम्ही भगवंताप्रति असलेली तुमची तळमळ आणि प्रेम यांवर मनन करू शकता, आपल्या गहन अशा खऱ्या स्वस्वरूपाला जाणण्याच्या तीव्र इच्छेवर मनन करू शकता.

बाबांचे शब्द तुम्ही जेव्हा वाचाल आणि त्यांच्यावर मननचिंतन कराल, तेव्हा स्वतःला असे प्रश्न विचारत तुम्ही 'आत्म-विचार'ही करू शकता —

- बाबांच्या शब्दांमधून मला असे काय शिकता येईल की जे माझ्या साधनेला विकसित करेल?
- कोणती गोष्ट माझ्या साधनेत मला प्रोत्साहित करते?

- माझ्या हृदयातील आध्यात्मिक उत्कंठेच्या सद्‌गुणाला ओळखण्यासाठी आणि त्याची जोपासना करण्यासाठी मी कोणती व्यवहार्य पावले उचलू शकतो?

© २०१८ एस.वाय.डी.ए. फाउंडेशन®| सर्वाधिकार सुरक्षित.